मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 4 फेब्रुवारी 2025 | पान- 1

# सावधान..! शहरातील 13 ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य

## दूषित पाण्याद्वारे 'जीबीएस'ची लागण होण्याची शक्यता : पाण्याची पुन्हा तपासणी करण्याचा महापालिकेचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे रूग्ण वाढत असल्याने महापालिकेने शहरातील २३ ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील राज्य आरोग्य प्रयोगशाळेत पाठविले होते. त्यापैकी थेरगाव, पिंपरी, काळेवाडी, अजमेरा, दिघी, ताथवडे, मोशी, भूमकर वस्ती आदी १३ परिसरातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला आहे. दूषित पाण्याद्वारे 'जीबीएस'ची लागण होण्याची शक्यता असल्याने महापालिकेने या भागातील पाण्याची पुन्हा तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात जीबीएस आजाराचे १७ संशयित रूग्ण आहेत. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे. वाढत्या रूग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर



महापालिकेने शहरातील पाणी तपासणीची मोहिम हाती घेतली आहे. या आजाराची प्राथमिक लक्षणे आढळलेली संशयित रूग्ण ज्या भागात वास्तव्य करतात, त्या परिसरात महापालिकेद्वारे नळामार्फत पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे नमुने तपासण्यात येत आहेत. त्यानुसार शहरातील २३ ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील राज्य आरोग्य प्रयोगशाळेत पाठविले होते. त्यापैकी थेरगाव, पिंपरी, काळेवाडी, अजमेरा, दिघी, ताथवडे, मोशी, भूमकर वस्ती, संत तुकारामनगर परिसरातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला आहे.

### निर्जंतुकीकरण करूनच पाणीपुरवठा

» महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रात पाणी निर्जंतुकीकरण केले जाते. विविध शास्त्रोक्त प्रक्रियांचे अवलंब करूनच शहरामध्ये पाणीपुरवठा केला जातो. पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी 'टीसीएल' पावडर वापरण्यात येते. नागरिकांना शुद्ध पाणी मिळण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करण्यात येत आहे. अत्याधुनिक पद्धतीने पाच टप्प्यात पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया केली जाते. क्लोरीन टाकून पाण्यातील जंतू मारले जातात. त्यानंतर पाण्यात 'लिक्विड' मिसळले जाते. फिल्टरने पाणी स्वच्छ केले जाते. त्यानंतर शुद्ध टाकीमध्ये पाणी सोडले जाते. या टाकीत पाणी सोडतानाच निर्जंतुकीकरण करण्यासाठी आवश्यकतेनुसार 'लिक्विड क्लोरिन' सोडला जातो. त्यानंतर प्रयोगशाळेत दर दहा मिनिटाला पाण्यात क्लोरिन आहे की नाही, याची तपासणी केली जाते. त्यानंतर हे जलवाहिनीव्दारे नागरिकांना वितरित केले जाते.

> ज्या भागातील पाणी दूषित आढळले आहे. त्या भागातील पाण्याची पुन्हा तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. 'ओटी सोल्यूशन' टाकून पाणी तपासण्यात येणार आहे. वैद्यकीय विभागाने पाण्याचे नमुने घेताना पाणी पुरवठ्याच्या अधिकाऱ्यांना सोबत घ्यावे.
>
> - प्रमोद ओंबासे, मुख्य अभियंता, महापालिका.

---

# महापालिका महिला बचत गटांना 37 गाळे मोफत देणार!

## विधायक उपक्रम: नोंदणीकृत व पाच वर्षे पूर्ण झालेल्या महिला बचत गटांकडून अर्ज मागविले

**पिंपरी | प्रतिनिधी**

नोंदणीकृत महिला बचत गटांना अनुदान तसेच विविध माध्यमातून बळ दिले जात असताना महापालिकेच्या समाजविकास विभागाच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत शहराच्या विविध भागांमधील एकूण ३७ गाळे महिला बचत गटांना मोफत उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. त्याकरिता नोंदणीकृत व पाच वर्षे पूर्ण झालेल्या महिला बचत गटांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

महापालिकेने विविध भागांमध्ये व्यापारी गाळे बांधलेले आहेत. हे गाळे भाडेतत्वावर उपलब्ध करू देण्याची प्रक्रिया पालिकेच्या भूमी व



जिंदगी विभागाच्या वतीने केली जाते. तत्पूर्वी महापालिकेच्या नगररचना विभागाकडून त्या भागातील भाडेदराची पडताळणी केली जाते. या विभागाने ठरवून दिलेल्या दरानुसार निविदा प्रसिद्ध करून या गाळ्यांचे वितरण केले जाते. मात्र नागरवस्ती विभागाने महिला सक्षमीकरणासाठीआकुर्डीतील गंगानगरमधील कै. पांडुरंग काळभोर सभागृह येथील व्यापारी संकुलातील एकूण १४ गाळे तर भोसरी भाजी मंडईतील व्यापारी संकुलातील पहिल्या मजल्यावरील एकूण २३ गाळे या उपक्रमासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी आयुक्तांकडे केली होती.

दरम्यान, या मागणीची दखल घेत, भूमी व जिंदगी विभागाने आपल्या अधिकारातील या दोन्ही ठिकाणचे व्यापारी गाळे. नागरवस्ती विभागाकडे हस्तांतरित केले आहेत. त्यानुसार आता या गाळ्याचे क्षेत्रफळ जाहीर करत, महापालिकेच्या समाजविकास विभागाने हे गाळे शहरातील महिला बचत गटांना मोफत उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यानुसार पात्र महिला बचत गटांकडून या गाळ्यांकरिता अर्ज मागविण्यात आले आहेत.

> नागरवस्ती विभागाने केलेल्या मागणीनुसार शहराच्या दोन ठिकाणच्या व्यापारी संकुलातील एकूण ३७ गाळे या विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. पुढील कार्यवाही या विभागामार्फत होणार आहे.
>
> – मंगेश कोळप, सहाय्यक आयुक्त, भूमी व जिंदगी विभाग.

# पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी लागणार 850 कोटी

## रस्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारकडून ही निधी आणणार : चंद्रकांत पाटीलांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

कोथरुड विधानसभा मतदारसंघातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी विकास आराखड्यातील रस्त्यांचे प्रश्न जलदगतीने मार्गी लावावेत, असे निर्देश नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी आज दिले. तसेच, रस्त्यांच्या विकासासाठी राज्य सरकारकडूनही निधी आणू, अशी ग्वाही नामदार पाटील यांनी दिली. नामदार पाटील यांनी आज कोथरुड विधानसभा मतदारसंघातील मिसिंग लिंकचा आढावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून घेऊन; रस्ते विकासामध्ये येणाऱ्या अडचणींची सविस्तर माहिती घेतली.



यावेळी आमदार योगेश टिळेकर, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर, वाहतूक शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, वाहतूक पोलीस निरीक्षक जावेद पठाण, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे संजय कदम, मालमत्ता महेश पाटील, दिलीप काळे, गिरीश दाबकेकर, विजय नायकर, अविनाश संकपाळ, राऊत, भाजपा पुणे शहर सरचिटणीस पुनीत जोशी, गणेश कळमकर, कोथरुड दक्षिण मंडल अध्यक्ष संदीप बुटाला, उत्तर मंडल अध्यक्ष सचिन पाषाणकर, माजी नगरसेवक दीपक पोटे, दिलीप वेडे-पाटील, शिवरामपंत मेंगडे, लहू बालवडकर, राहुल कोकाटे यांच्या सह भाजपचे पदाधिकारी आणि महापालिकेचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी कोथरूड मधील रस्त्यांच्या कामाचे सादरीकरण केले. यामध्ये पुणे शहरातील ३३ पैकी १५ प्रमुख रस्त्यांचे काम हाती घेतले असून याला 'मिशन १५' असे नाव दिले असल्याचे सांगितले. यामध्ये रस्त्यांचे खड्डे बुजवणे, चेंबर समपातळी करणे, रस्ते सुरक्षेच्या अनुषंगाने उपाययोजना करणे, रोड लेन, झेब्रा क्रॉसिंग, वाहतूक नियमन फलक लावणे, पदपथ दुरुस्ती, अतिक्रमण हटविणे, चौक सुशोभिकरण व स्वच्छता आदी बाबींवर काम सुरु असल्याची माहिती दिली. तसेच मिशन १५ मध्ये कोथरूड मधील प्रमुख चार रस्त्यांचा ही समावेश असल्याची माहिती दिली.

त्यावर नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी इतर मिसिंग लिंकबाबत माहिती देण्याची सूचना केली. त्यावर २६ मिसिंग लिंक असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामधील सात प्रमुख असल्याचीही माहिती त्यांनी यावेळी दिली.त्यावर नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी सदर रस्त्याच्या विकासामध्ये कोणत्या अडचणी येत असल्याचा सवाल केला.

पावसकर यांनी मिसिंग लिंकचे काम पूर्ण करण्यात जमीन अधिग्रहणामध्ये अडथळे येत असल्याचे सांगितले. त्यावर नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी नागरिकांशी समन्वय आणि संवाद साधून सदर विषय जलदगतीने मार्गी लावण्याच्या सूचना केल्या. तसेच, शहरातील रस्ते विकासासाठी अतिजटील समस्यांचा अहवाल तयार करावा. त्या समस्या सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांच्या सोबत बैठक घेऊन मार्ग काढू, असेही आश्वस्त केले.

दरम्यान, 'मिशन १५' अंतर्गत रस्ते विकासासाठी एकूण ८७० कोटी खर्च अपेक्षित असून कोथरुड विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकासासाठी ३२५ कोटी लागणार असल्याची माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली . त्यापैकी १५० कोटी राज्य सरकारकडून आणण्यासाठी पाठपुरावा करु. उर्वरित निधी महापालिकेने द्यावा असे निर्देश यावेळी दिले.

# गोध्रा हत्याकांडातील आरोपीकडून लुटमारीचे गुन्हे

## पुणे, नाशिक जिल्ह्यात साथीदारांच्या मदतीने 16 गुन्हे : 14 लाख 50 हजारांचा ऐवज जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

ग्रोधा हत्याकांडात जन्मठेप झालेल्या आरोपीने कारागृहातून संचित रजा मिळवून (पॅरोल) पुणे आणि नाशिक जिल्ह्यात साथीदारांच्या मदतीने वाहनचालकांना अडवून लुटमारीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी आळेफाटा पोलिसांनी गोध्रा हत्याकांडातील आरोपीसह त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांना अटक केली. या टोळीने आळेफाटा, मंचर, नाशिक जिल्ह्यातील सिन्नर परिसरात गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यांच्याकडून १४ लाख ४१ हजारांचा ऐवज जप्त केला आहे.



याप्रकरणी सलीम उर्फ सलमान युसुफ जर्दा (वय ५५), साहिल हनीफ पठाण (वय २१), सुफीयान सिकंदर चँदकी (वय २३,) आयुब इसाग सुनठीया (वय २९), इरफान अब्दुलहामीद दुरवेश (वय ४१, सर्व रा. गोध्रा, गुजरात) यांना अटक करण्यात आली. आरोपी सलीम जर्दा हा गोध्रा हत्याकांडातील मुख्य आरोपी असून, त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. कारागृहातून तो संचित रजा (पॅरोल) मिळवून तो बाहेर पडला. त्यानंतर तो कारागृहात परतला नाही. फरार झाल्यानंतर आरोपी सलीम जर्दने साथीदारांशी संगनमत करुन घरफोडीचे गुन्हे करण्यास सुरुवात केली. आळे फाटा परिसरात या टोळीने एका टेम्पोचालकाला लुटले होते. टेम्पोतील टायर ट्यूब चोरून आरोपी पसार झाले होते. या टोळीविरुद्ध विविध पोलीस ठाण्यात १६ गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

### सलमान जर्दाचे तीन राज्यांत नेटवर्क

» मुख्य आरोपी सलीम उर्फ सलमान जर्दा हा गोध्रा हत्याकांडातील मुख्य आरोपी असून त्यासआजन्म कारावासाची शिक्षा झाली असून या कालावधीमध्ये तो शिक्षा भोगत असताना ८ वेळेस पॅरोल रजेवर असताना तो परत कारागृहात हजर न होता टोळी बनवून चोरीचे गुन्हे करीत होता. त्याच्यावर पुणे, नाशिक, गुजरात, राजस्थान या ठिकाणी गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती आळेफाटा पोलिसांनी यावेळी दिली.

त्यानंतर आळेफाटा पोलिसांच्या पथकाकडून तपास सुरू करण्यात आला. वाहनचालकांना अडवून लूटमार करणारी टोळी गुजरातमधील असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. आरोपी नाशिकमधील चांदवड परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने आरोपी जर्दा याच्यासह साथीदारांना सापळा लावून पकडले. पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली आळेफाटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, सहायक निरीक्षक अमोल पन्हाळकर, चंद्रा डुंबरे, विकास गोसावी, विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित पोळ, अमित माळुंजे, नवीन अरगडे, सचिन रहाणे, ओंकार खुणे, गणेश जगताप यांनी ही कामगिरी केली.

# देशभरात स्वस्तातील आयुष औषधी केंद्राचे जाळे उभारणार; केंद्रीय मंत्र्यांची माहिती

## इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशन व इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ आयुर्वेद यांच्या सहकार्याने आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

आयुर्वेद सर्व प्रकारच्या व्याधींवर परिणामकारक उपचारपद्धती आहे. आयुर्वेदाला जगभर सर्वमान्यता मिळू लागली आहे. प्रभावी आयुर्वेदासाठी संशोधनाची व्याप्ती वाढवण्यासह 'इनोव्हेशन व स्टार्टअप' सुरू करण्यासाठी आयुष मंत्रालयामार्फत चालना दिली जाईल. सर्वगुणकारी आयुष औषधी सहज उपलब्ध होण्यासाठी देशभरात आयुष औषधी केंद्रांचे जाळे उभारण्यात येणार आहे, असे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले.



डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठ संचालित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटर यांच्या पुढाकाराने नवी दिल्ली येथील ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस, नेदरलँड येथील इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशन व इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ आयुर्वेद यांच्या सहकार्याने आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. स्मिता जाधव, खासदार श्रीरंग बारणे, अमेरिकास्थित शास्त्रज्ञ डॉ. टोनी नाडर, आयुष मंत्रालयाचे सल्लागार सचिव वैद्य मनोज नेसरी यावेळी उपस्थित होते.

जाधव म्हणाले, 'योग व आयुर्वेद ही भारताची ओळख आहे. शंभराहून अधिक देशांत आयुर्वेद पोहोचला आहे, तर १८० देशांत योगदिवस साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आयुर्वेदीय औषधांना, उपचारांना प्रभावी करण्यासाठी व मान्यता मिळण्यासाठी सखोल संशोधन होणे गरजेचे आहे. त्यामुळेच संशोधनावर भर दिला जात आहे. डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालयांसारख्या संस्थांमध्ये संशोधन व विकास केंद्राची उभारणी करण्याचा विचार सुरू आहे. अनेक औषधांना 'आयएसओ' मानांकन दिले जात आहे. देशातही घराघरांत आयुर्वेद जाण्यासाठी 'देश का प्रकृती परीक्षण' उपक्रम आणला असून, त्यामध्ये सव्वा कोटी लोकांची माहिती संकलित केली आहे'.

संमेलनामध्ये जागतिक स्तरावर आयुर्वेद प्रसारासाठी डॉ. गुणवंत येवला आणि डॉ. वॉल्टर मोईल्क यांना 'आयुर्वेद धन्वंतरी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. आयुर्वेदातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. संजीव गोयल, डॉ. अखिलेश वर्मा, डॉ. एस. एन. पांडे, डॉ. रामदास आव्हाड यांना सन्मानित करण्यात आले. आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसिनच्या मान्यतेने झालेल्या या दोन दिवसीय संमेलनाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील संशोधन संचालक प्रा. डॉ. अस्मिता वेले, कायाचिकित्सा विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. जी. दीपांकर, रचना विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. योगेश कुट्टे यांनी परिश्रम घेतले. दहा देशातील १०० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ आणि १२०० हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील संशोधक, वैद्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. ५०० हुन शोधनिबंध सादर झाले.

वैद्य मनोज नेसरी म्हणाले, "महर्षी आयुर्वेद ही जागतिक स्तरावरील मोठी सामाजिक संस्था आहे. आयुर्वेद उत्पादनांची निर्यात वाढत असून, या क्षेत्राचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत आहे. आयुर्वेद जगभर पोहोचत आहे. संशोधन होत आहे. त्यामुळे आयुर्वेदाची विश्वासार्हता व प्रभावीपणा दिवसेंदिवस वाढत आहे." डॉ. टोनी नेडर, वैद्य देवेंद्र त्रिगुणा, डॉ. सुभाष रानडे, डॉ. गिरीश मोमया, डॉ. जयंत देवपुजारी यांनीही मनोगते व्यक्त केली. डॉ. लोथर पियार्क व डॉ. योगेश कुट्टे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गुणवंत येवला यांनी आभार मानले.

### आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याचे पाऊल स्वागतार्ह

» डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, 'भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलन पुण्यात होत असल्याचा आनंद आहे. जगभरातील आयुर्वेदतज्ज्ञ, विद्यार्थी येथे आल्याने विचारांचे आदानप्रदान होत आहे. सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये आयुर्वेदाचा समावेश ही चांगली बाब आहे. वैदिक संस्कृती, आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याचे पाऊल स्वागतार्ह आहे'.

# मुदत उलटून वर्षभरानंतरही भोसरी वाहनतळाचे काम अपूर्ण

## सम, विषम तारखेच्या पार्कींग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने या रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केलेल्या दुचाकींमुळे वाहतूक कोंडीत भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावणे आठ कोटी रूपये खर्चून भोसरी-आळंदी रस्त्यावरील प्रभाग क्र. 5 मधील बहुमजली सशुल्क वाहनतळ उभारण्याच्या कामाची मुदत संपून वर्ष उलटले तरी देखील हे काम अपूर्ण आहे. या वाहनतळाचा वापर याठिकाणचे स्थानिक रहिवाशी वाहने उभी करण्यासाठी करत आहेत. आणखी किती दिवस या वाहनतळाचे काम सुरू राहणार आहे, असा सवाल नागरिक करत आहेत.




भोसरी विधानसभा मतदार संघातील भोसरी-आळंदी रस्त्यावरील आळंदी चौक ते शास्त्री चौकदरम्यानची बाजारपेठ प्रति लक्ष्मीरोड म्हणून ओळखली जाते. पुणे-नाशिक महामार्गावर उड्डाणपूल उभारताना या रस्त्यावर उड्डाणपूल उभारण्याची मागणी महापालिका प्रशासनाने फारशी गांभिर्याने न घेतल्याने या रस्त्यावर अहोरात्र वाहतूक सुरू असल्याने वाहतूक कोंडीचा दररोजचा अनुभव प्रवासी व नागरिकांना घ्यावा लागत आहे. तर सम, विषम तारखेच्या पार्कींग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने या रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केलेल्या दुचाकींमुळे वाहतूक कोंडीत भरच पडत असते.

या रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महापालिकेच्या वतीने भोसरी-आळंदी रस्त्यावरील सखुबाई गवळी उद्यानाच्या 1866 चौ. मी. जागेवर महापालिकेच्या वतीने दुचाकी व चारचाकींकरिता तळमजला प्लस तीन मजले असे बहुमजली सशुल्क वाहनतळ उभारण्याचे काम मेसर्स सिद्धनाथ कॉर्पोरेशन या ठेकेदाराला देण्यात आले आहे.

या कामाचा आदेश 23 फेब्रुवारी 2022 रोजी देण्यात आला असून, हे काम पूर्ण करण्यासाठी दिलेली 24 महिन्यांची मुदत 22 फेब्रुवारी 2024 रोजी संपली आहे. तरीदेखील या वाहतळाचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे भोसरी-आळंदी रस्त्यावरील वाहतूक कोंडीवरील उपाययोजना करण्यात अडचण येत असल्याचे चित्र आहे.

### असे आहे बहुमजली सशुल्क वाहनतळ

- बहुमजली वाहनतळाचे क्षेत्र- 1866 चौ. मी
- तळमजला प्लस तीन मजले असलेली इमारत
- प्रत्येक मजल्यावर 25 चारचाकी वाहने उभी करता येणार
- एकूण 100 चारचाकी वाहन पार्कींगचे नियोजन
- तळमजल्यावर 150 दुचाकी वाहने उभढ़ी करण्याची क्षमता
- सर्व मजल्यांवर जिना व लिफ्टची सोय

"या वाहनतळाचे काम अपूर्ण असल्याने अद्यापपर्यंत त्याचे भूमी व जिंदगी विभागाकडे हस्तांतर झालेले नाही. हे काम पूर्ण झाल्यानंतर आमच्या विभागाकडे हस्तांतर झाले तरी या सशुल्क वाहनतळाचे संचलन इ क्षेत्रीय कार्यालयाच्या अधीन असणार आहे.

**- मुकेश कोळप, सहाय्यक आयुक्त, भूमी व जिंदगी विभाग पिंपरी चिंचवड महापालिका**

# शिरूरकरांचे आरोग्य धोक्यात; सांडपाण्याचे दूषित ओहोळ थेट घोडनदी पात्रात

## सांडपाण्याचे 5 मोठे, 25 छोटे ओहोळ थेट घोडनदी पात्रात मिसळत असल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या घोडनदीच्या संपूर्ण काठावर माजलेल्या जलपर्णी आणि विषारी वणस्पती... झाडाझुडपांना केरकचरा व घाण अडकून सुटलेली दूर्गंधी... नदीपात्रात आणून टाकलेला राडारोडा आणि काही ठिकाणी तर चक्क पूररेषा ओलांडून नदीपात्रात झालेली बांधकामे... फाटके कपडे, चिंध्या, केरकचरा, केसांचे पुंजके आणि प्लॅस्टिकच्या कचऱ्याने गच्च भरलेला किनारा... काही ठिकाणी मेलेल्या माशांचा खच, इतस्ततः विखूरलेले कोंबड्यांचे पंख व वेस्टेज आणि एका ठिकाणी चक्क नदीपात्रात मेलेले कुत्रे... शिरूर शहर आणि परिसरातून वाहणाऱ्या घोडनदीच्या किनाऱ्यावरून सहज फेरफटका मारला तरी तब्बल पाच मोठे आणि सुमारे 25 छोटे सांडपाण्याचे ओहोळ थेट घोडनदी पात्रात मिसळत असल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे.

शिरूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेचा उद्भव असलेल्या घोडनदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यात तर याहून वाईट स्थिती असून बंधाऱ्याच्या लोखंडी ढाप्यांना मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक, कागदाचा कचरा, देवदेवतांचे जीर्ण फोटो, प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या भग्न मूर्ती, चिंध्या अडकून पडल्या आहेत तर मोठ्या प्रमाणात जलपर्णींचा विळखा देखील बसला आहे. सुमारे एक लाख लोकसंख्येच्या शिरूर शहराला घोडनदीवरून राबविलेल्या योजनेतून पाणीपुरवठा केला जातो. घोडनदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याजवळील पंपिंग स्टेशनवरून जलशुद्धीकरण केंद्रावर नेलेले पाणी शहरवासियांना टप्प्याटप्प्याने वितरित केले जाते. या बंधाऱ्यात डिंभे धरणातून किंवा डिंभे उजव्या कालव्याच्या वितरिकेतून पाणी सोडले जाते. तब्बल 27 बंधारे भरल्यानंतर हे पाणी शिरूर शहराच्या बंधाऱ्यात येते.



### या ठिकाणाहून मिसळते नदीपात्रात सांडपाणी...

» मोतीनाला हा सर्वात मोठा ओढा शिरूर शहराजवळ घोडनदीला मिळत असून त्यातून मोठ्या प्रमाणात सांडपाणी नदीपात्रात जात आहे. रांजणगाव एमआयडीसीतील काही कंपन्या घातक रसायन व दूषित पाणी याच ओढ्यात सोडत असून सरदवाडी, कारेगाव, महाजन मळा येथील सांडपाणी देखील याच ओढ्यात सोडले जाते व हा ओढा घोडनदीतील बंधाऱ्याजवळ मिळत असल्याने मोठ्या प्रमाणातील सांडपाण्यामुळे तेथे नदीपात्रातील पाण्याचा रंग देखील काळसर दिसून येतो. काही केमिकल कंपन्यांतील सांडपाणी रात्रीच्या वेळी टँकरमधून थेट नदीपात्रात आणून टाकले जात असल्याच्याही तक्रारी आहेत. याशिवाय शहरातील प्रोफेसर कॉलनी, ढोर आळी, कैकाड आळी, काची आळी, कुंभार आळी, दशक्रिया विधी घाट, वीटभट्ट्या या परिसरातून मैलापाणी व सांडपाण्यांचे सतत वाहणारे ओहोळ नदीपात्रात मिसळताना दिसतात.

> शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात सांडपाण्याचे प्रमाण अधिक असून त्यावर प्रक्रिया केली जाते. तरीही अतिरिक्त एचटीपी प्लँटबाबत डीपीआर तयार केला असून शासन मान्यतेसाठी पाठविला आहे. साडेतीन कोटी रूपये खर्चाच्या या प्रकल्पानंतर मैलापाणी व सांडपाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करता येईल.
>
> - प्रीतम पाटील, मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद

> शहरात मोतीनाला व खारामळा या दोन ठिकाणी सांडपाणी व मैलापाणी पंपिंग करून ते शनिमंदिराजवळील सिवेज ट्रीटमेंट प्लँटमध्ये नेले जाते व तेथे त्यावर प्रक्रिया करून हे पाणी घोडनदीपात्रात सोडले जाते किंवा नदीकिनारी केलेल्या वनराईला दिले जाते. शेजारील ग्रामपंचायतींकडून व इतर छोट्या गावातील सांडपाणी नदीपात्रात मिसळले जात असावे. त्याबाबत पाहणी करून नगर परिषदेमार्फत नोटीसा बजावल्या जातील.
>
> - आदित्य बनकर, अभियंता,पाणीपुरवठा व स्वच्छता, विभाग, शिरूर नगरपरिषद

> दूषित पाण्यामुळे टायफॉईड, अतिसार, नारू हे आजार बळावत असून पाण्यातील रासायनिक घटकांमुळे यकृत, मूत्रपींड व मेंदूवर परिणामाची शक्यता असते. पाण्यातून सातत्याने रासायनिक घटक शरीरात गेल्यास व दीर्घ काळ संपर्क आल्यास कर्करोगासारख्या असाध्य व्याधीही जडू शकतात. घोडनदीचे पाणी पिण्यास लायक नसल्याचे अनेक चाचण्यांतून यापूर्वी स्पष्ट झाले आहे
>
> - डॉ. विक्रम घावटे, बालरोगज्ज्ञ, शिरूर

# अर्थसंकल्पात शेतकऱ्याच्या पदरी निराशाच : डॉ. अजित नवले

## शेतीसाठी करण्यात आलेल्या बहुतांशी घोषणा या सुद्धा उद्योगपती आणि कॉर्पोरेट कंपन्यांनाच लाभ पोहोचवणाऱ्या आहेत,

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये शेती आणि शेतकऱ्यांना झुकते माप दिले गेल्याचे भासवण्यात येत असले तरी प्रत्यक्षात मात्र शेतीसाठी करण्यात आलेल्या बहुतांशी घोषणा या सुद्धा उद्योगपती आणि कॉर्पोरेट कंपन्यांनाच लाभ पोहोचवणाऱ्या आहेत, अशी माहिती अखिल भारतीय किसान सभेचे केंद्रीय सहसचिव डॉ. अजित नवले यांनी दिली.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून त्यांच्या कापसाला रास्त भाव मिळेल यासाठी ठोस तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली असती तर ती खऱ्या अर्थानं कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देणारी ठरली असती. प्रत्यक्षात मात्र टेक्स्टाईल इंडस्ट्रीसाठी तरतूद करण्यात आली आहे व त्यामुळे अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांचं भलं होणार असल्याचे भासवलं जात आहे.

आसाम मध्ये युरिया प्लांट सुरू करून खतांबद्दल विशेषता युरिया बद्दल आत्मनिर्भर होण्याच्या बाबत पाऊल टाकल्याचं जाहीर करण्यात आले आहे. दुसऱ्या बाजूला मात्र गेल्या अनेक वर्ष खतांवरची सबसिडी कमी केली जाते आहे. परिणामी खतांचे भाव आणि शेतीचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढून शेती तोट्यात जात आहे. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अनुदानाच्या माध्यमातून खतांच्या किमती कमी करणे आवश्यक होते ते मात्र पुरेशा प्रमाणामध्ये झालेले दिसत नाही.

सरकारच्या धोरणामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. किसान सभा व शेतकरी आंदोलनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी ही मागणी सातत्याने लावून धरलेली आहे.



### ...रास्त भरपाई मिळावी

» नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांना रास्त भरपाई मिळावी यासाठी पीक विमा योजना राबवली जाते. प्रत्यक्षात मात्र या योजनेचा लाभ विमा कंपन्या व भ्रष्ट नेते घेताना दिसतात. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून याबाबत बदल करून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना रास्त मदत मिळण्याबद्दल पावले टाकण्याची आवश्यकता होती. दुर्दैवाने अर्थसंकल्पात तसे झालेले दिसत नाही, असे डॉ. अजित नवले यांनी नमूद केले.

### खरेदी यंत्रणा सक्षम होत नाही तोपर्यंत

» तेलबिया आणि डाळी बद्दल घोषणा करण्यात आली असली तरी मागील अनुभव पाहता, जोपर्यंत तेलबिया व डाळ पिकांना रास्त भावाची हमी मिळत नाही व त्यासाठी सरकारी खरेदी यंत्रणा सक्षम होत नाही तोपर्यंत या घोषणांचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कोणताही लाभ होणार नाही, असे डॉ. अजित नवले यांनी नमूद केले.